THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

FRIDAY, 11TH DECEMBER 1896.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

**सन १८९६ चा आक्टाचा मसुदा नंबर १ (सन १८९१ चा मुंबईचा बॉयलर तपासण्याविषयींचा आक्ट सुधारण्याविषयींच्या आक्टाचा मसुदा) ह्याचा विचार करण्यासाठीं नेमिलेल्या सिलेक्ट कमिटीचा दुसरा रिपोर्ट.**

सदर्हू मसुद्याचा आणि तारीख १८ माहे आगस्ट सन १८९६ रोजीं आह्मांकडे विचारासाठीं दिलेल्या जास्त सुधारणांचा आह्मीं काळजीपूर्वक विचार केला आहे.

२. पाहण्यास सोईचें पडावें ह्मणून, सदर्हू सुधारणांची याद आह्मीं खालीं दिली आहे.

ह्या सुचविलेल्या सुधारणा खालीं लिहिल्याप्रमाणें आहेतः—

कलम ६ याची सुधारणा.

१.—सदर्हू आक्टाचें कलम ६, पोटकम (२), यांतील विशेष ठरावाच्या (इ) रकमेच्या बदला, खालील मजकुर दाखल करावा :—

"(इ) पोटकलम (१) याच्या (ड) रकमेंतील ठराव लागू राहून, जो कोणत्याही बॉयलरचा मालक सदरीं सांगितल्या प्रकारचा त्या बॉयलराबद्दलचा दाखला धारण करीत असेल आणि जो अशा दाखल्याची मुदत संपण्यापूर्वीं, सदर्हू मुदत संपल्यानंतर त्या बॉयलरचा उपयोग करीत राहण्याचा आपला इरादा आहे ह्मणून नोटीस देईल, त्यास, तो बॉयलर तपासल्यानंतर इन्स्पेक्टरानें लेखी हुकुम करून त्या बॉयलराचा उपयोग करण्याचें अगदीं बंद ठेवण्याबद्दल फर्माविलें नाहीं तर, नवीन दाखला देण्यांत येई किंवा नाकारण्यांत येई तोंपर्यंत, त्या बॉयलरचा उपयोग करीत राहण्याचा अगर उपयोग करण्याची परवानगी देण्याचा अखत्यार आहे; परंतु—

(१) मुदत संपलेल्या दाखल्यांत जो दाब असण्याविषयीं परवानगी दिलेली असेल, किंवा

(२) इन्स्पेक्टरानें बॉयलर तपासून जो हंगामी हुकुम लिहून दिलेला असेल त्यांत जो दाब असण्याविषयीं परवानगी दिलेली असेल,

त्या दाबापेक्षां कोणत्याही अधिक दाबानें सदर्हू प्रकारें त्या बॉयलरचा उपयोग करूं नये किंवा उपयोग करूं देऊं नये."

कलम ११ याची सुधारणा.

२.—सदर्हू आक्टाच्या ११ व्या कलमांत, "मुदतीचा" ह्या शब्दानंतर, "किंवा दाबाचा" हे शब्द दाखल करावे.

कलम १२ याची सुधारणा.

३.—सदर्हू आक्टाच्या १२ व्या कलमाच्या (२) व्या पोटकलमांत "त्या मुदतीचा" ह्या शब्दांनंतर, "आणि जो दाब असण्याविषयीं परवानगी देणें योग्य वाटेल त्या दाबाचा" हे शब्द दाखल करावे.

कलम १८ याचा सुधारणा.

४.—सदहू आक्टाच्या १८ व्या कलमाच्या (१) पोटकलमांत. "प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेटानें" ह्या शब्दांनंतर "किंवा कोणत्याही इन्स्पेक्टरानें" हे शब्द दाखल करावे.

कलम ३७ याची सुधारणा

५.—सदहू आक्टाच्या ३७ व्या कलमाच्या (१) पोटकलमापैकीं (अ) रकमेच्या ऐवजीं खालील मजकुर दाखल करावा :—

"(अ) ह्या आक्टाचे जे ठराव बॉयलरांबाबद दाखले मिळविण्याच्या व देण्याच्या संबंधाचे किंवा बॉयलरांची तपासणी करण्यासंबंधाचे आहेत, ते सर्व किंवा त्यांतले कोणतेही ठराव, ज्या जागेंत किंवा जिल्ह्यांत हा आक्ट त्या त्या वेळीं अमलांत असेल, त्या जागेंतील किंवा जिल्ह्यांतील सर्व प्रैममून्हरांस किंवा कोणत्याही विशेष वर्गाच्या प्रैममून्हरांस लागू करण्याचा".

६.- सदहू आक्टाचें कलम ३९ हें असें सुधरावें कीं, त्यावरून, कलम ६ (ड) ह्याअन्वयें, अमुक एंजिनीयर प्रत्यक्ष रीतानें व स्वतः बॉयलर चालवीत होता व तो त्याच्या स्वाधीन होता किंवा तशी गोष्ट नव्हती असें केव्हां केव्हां ठरवितां येईल त्याबद्दल एक कानू सरकारास करतां यावी.

३. सदरील सुचविलेल्या पहिल्या सुधारणेच्या संबंधानें आमची अशी शिफारस आहे कीं, सदहू आक्टाच्या ६ व्या कलमाच्या (२) पोटकलमाच्या (इ रकमेऐवजीं, खालील मजकुर दाखल करावा ; तो येणेंप्रमाणें :—

नवीन बॉयलरांच्या संबंधानें विशेष ठराव.

"(इ) ज्या कोणत्याही बॉयलराबद्दल पूर्वी कोणताही दाखला दिलेला नसेल त्या बॉयलरच्या बाबतींत इन्स्पेक्टर दाखला तावडतोब देण्यास समर्थ नसेल तर त्यानें, तो बॉयलर तपासल्यानंतर ४८ तासांच्या आंत, त्या बॉयलरच्या मालकास एक हंगामी हुकुम लिहून दिला पाहिजे ; आणि त्या हुकुमांत, दाखला देण्यांत किंवा देण्याचें नाकारण्यांत येई तोंपर्यंत तो बॉयलर त्याच्या मतें किती दाबानें चालू ठेवण्यास हरकत नाहीं तें निर्दिष्ट केलेलें असलें पाहिजे ; आणि पोटकलम (१), रकम (ड), यांतील ठराव लागू राहून, त्या मालकानें, दाखला देण्यांत किंवा नाकारण्यांत येई तोंपर्यंत, अशा हंगामी हुकुमाअन्वयें तो बॉयलर चालू ठेवणें कायदेशीर होईल";

त्याच पोटकलमांतील (फ) रकमेच्या ऐवजीं खालील मजकुर दाखल करावा : तो येणेंप्रमाणें :—

दाखला दिलेल्या बॉयलरांसंबंधानें विशेष ठराव.

"(फ) पोटकलम (१) याच्या (ड) रकमेंतील ठराव लागू राहून, जो कोणत्याही बॉयलरचा मालक सदरीं सांगितल्याप्रकारचा त्या बॉयलरबद्दलचा दाखला धारण करीत असेल, आणि जो अशा दाखल्याची मुदत संपण्यापूर्वीं, सदहू मुदत संपल्यानंतर त्या बॉयलरचा उपयोग करीत राहण्याचा आपला इरादा आहे ह्मणून नोटीस देईल, त्यास, तो बॉयलर तपासल्यानंतर इन्स्पेक्टरानें लेखी हुकुम करून त्या बॉयलरचा उपयोग करण्याचें अगदीं बंद ठेवण्याबद्दल फर्माविलें नाहीं तर, नवीन दाखला देण्यांत येई किंवा नाकारण्यांत येई तोंपर्यंत त्या बॉयलरचा उपयोग करीत राहण्याचा अगर उपयोग करण्याची परवानगी देण्याचा अखत्यार आहे : परंतु त्यानें—

(१) मुदत संपलेल्या दाखल्यांत जो दाब असण्याविषयीं परवानगी दिलेली असेल, किंवा

(२) इन्स्पेक्टरानें बॉयलर तपासून जो हंगामी हुकुम लिहून दिलेला असेल, त्यांत जो दाब असण्याविषयीं परवानगी दिलेली असेल,

त्या दाबापेक्षां कोणत्याही अधिक दाबानें सदहू प्रकारें त्या बॉयलरचा उपयोग करूं नये किंवा उपयोग करूं देऊं नये ;"

त्याच पोटकलमाच्या ज्या रकमेला (फ) अक्षर दिलेलें आहे, तिला (ग) हें अक्षर देऊन ती सदहू रकमेच्या नंतर दाखल करावी आणि तिला "एकाच मालकाच्या बॉयलरांच्या दोन गटांविषयीं विशेष ठराव" अशी रकान्यांतील टीप द्यावी, आणि खालील मजकूर, कलम ६ याचें पोटकलम (३) ह्मणून जास्त दाखल करावा : तो येणेंप्रमाणें:—

हंगामी हुकुमाची मुदत संपणें व तो स्वाधीन करणें.

"(३) कोणत्याही बॉयलराबद्दल कोणताही दाखला देण्यांत आल्यानंतर, पुनः देण्यांत आल्यानंतर किंवा नाकारण्यांत आल्यानंतर, अगर कोणत्याही बॉयलराबद्दल ह्या कलमाअन्वयें देण्यांत आलेला हंगामी हुकुम परत करण्यांत यावा ह्मणून कलेक्टराकडून किंवा ह्या बाबतींत सामान्यतः किंवा विशेषतः लेखीरीतीनें अधिकार दिलेल्या कोणत्याही मनुष्याकडून लेखी हुकुम बॉयलरच्या मालकास पोंचल्यानंतर, सदहूप्रकारें त्या बॉयलराबद्दल देण्यांत आलेला कोणताही हंगामी हुकुम मुळींच अमलांत राहणार नाहीं."

ह्या सूचनांच्या संबंधानें आमची अशी शिफारस आहे कीं, पोटकलम (१) ह्याच्या सुरवातीस, "कोणत्याही" ह्या शब्दाच्या आधीं, "पोटकलम (२) ह्यांतील विशेष ठराव लागू राहून," हे शब्द दाखल करावे.

४. सदरील सूचनांप्रमाणें सदर्हू आक्टांत सुधारणा केल्या असतां त्यांत खालीं लिहिलेले फेरफार करावे लागतील; ते करावे अशी आमची शिफारस आहे: ते फेरफार येणेंप्रमाणें:—

कलम १६ ह्यांत, "कलम १०,१२ अगर १४ याअन्वयें ज्या मुदतीबद्दल दाखला दिला असेल" ह्या मजकुराच्या ऐवजीं, "कलम ६ ह्याच्या (२) पोटकलमाअन्वयें हंगामी हुकुम किंवा कलम १०,१२ अगर १४ ह्याअन्वयें दाखला ज्या मुदतीबद्दल दिलेला असेल," हा मजकुर दाखल करावा, आणि त्याच कलमांत, "तो" आणि "दाखला" ह्या शब्दांच्या दरम्यान "हंगामी हुकुम अगर" हे शब्द दाखल करावे;

कलम १८ ह्याचें पोटकलम (१) ह्यांत, "दाखला" हा शब्द तीन ठिकाणीं आला आहे त्या तीनही ठिकाणीं त्या शब्दाच्या पूर्वीं "हंगामी हुकुम अगर" हे शब्द दाखल करावे; "सर्व वाजवीवेळीं" ह्या शब्दांनंतर "मुंबईच्या कलेक्टरानें अगर" हे शब्द दाखल करावे; आणि "अशा माजिस्ट्रेटानें किंवा कलेक्टरानें" ह्या शब्दांच्या बदला "सदर्हू शहरांत अशा कलेक्टरानें किंवा माजिस्ट्रेटानें अगर इतर ठिकाणीं अशा कलेक्टरानें" हा मजकुर दाखल करावा;

कलम १८, पोटकलम (२), ह्याच्या बदला खालील मजकुर दाखल करावा: तो येणेंप्रमाणें:—

"कोणत्याही बॉयलरबद्दल दिलेला हंगामी हुकुम किंवा दाखला अमलांत असेल त्या मुदतींत जो कोणताही मनुष्य त्या बॉयलरचा मालक होईल, त्यास त्या पहिल्या मालकाकडून तो हंगामी हुकुम किंवा तो दाखला मिळण्याचा हक्क प्राप्त होऊन तो पोटकलम (१) ह्यांतील ठरावांस पात्र होईल;"

कलम २८, रकम (ब) हींत, "दाखला" ह्या शब्दाच्या आधीं "हंगामी हुकुम अगर" हे शब्द दाखल करावे;

कलम २९, पोटकलम (१), रकम (अ), हींत, "दाखल्यावांचून" ह्या शब्दाच्या आधीं, "हंगामी हुकुमावांचून अगर" हे शब्द दाखल करावे;

कलम ३०, पोटकलम (१), रकम (क), हींत, "दाखल्यावरून" ह्या शब्दाच्या आधीं, "हंगामी हुकुमावरून किंवा" हे शब्द दाखल करावे.

५. सुचविलेल्या सुधारणा २ व ३ ह्या आह्मांस पसंत आहेत, आणि त्याप्रमाणें आक्ट सुधरावा अशी आमची शिफारस आहे.

६. सुचविलेल्या ४ थ्या सुधारणेसंबंधानें आमचें असें मत आहे कीं, सुचविल्याप्रमाणें कलम १८, पोटकलम (१), ह्यांत फेरफार करण्यास पुरेसें कारण दाखविण्यांत आलेलें नाहीं; कारण जरूर असलेला अधिकार इन्स्पेक्टरांना कलेक्टरांकडून किंवा इतर अमलदारांकडून नेहमीं मिळण्यासारखा आहे.

७. सुचविलेल्या ५ व्या सुधारणेसंबंधानें आमचें असें मत आहे कीं, कलम ३७, पोटकलम (१), रकम (अ) हींत जो फेरफार करावा ह्मणून सूचना करण्यांत आलेली आहे, तो फेरफार, जनरल डिपार्टमेंटाचा जाहिरनामा नंबर ५१५, तारीख ३ फेब्रुआरी १८९६ ह्यांत मेक्यानिकल इंजिनियरांचे दाखले व त्यांच्या परीक्षा ह्यांच्या संबंधाच्या ज्या कानू प्रसिद्ध करण्यांत आल्या आहेत त्या कानूंपैकीं ४८ व्या कानूंत बदल करण्याकरितां त्याच डिपार्टमेंटांत जो सरकारचा ठराव नुकताच झालेला आहे, त्याकडे लक्ष देतां करण्याची जरूरी नाहीं. ही नवीन कानू, जाहिरनामा नंबर ४२२१, तारीख २९ सप्टेंबर १८९६, ह्यांत प्रसिद्ध केली आहे.

८. सुचविलेल्या ६ व्या सुधारणेसंबंधानें आमचें असें मत आहे कीं, जो ठराव किंवा जी कानू करावी ह्मणून सूचना करण्यांत आलेली आहे, तो ठराव किंवा ती कानू करण्याची जरूरी असल्याबद्दल कारण मुळींच दाखविण्यांत आलें नाहीं.

९. एडन येथील पोलिटिकल रेसिडेंटांनीं जी सुधारणा सुचविली आहे ती स्वीकारावी अशी आमची शिफारस आहे. ती सुधारणा ही कीं, मसुद्याचें कलम ४ (१) (ब) ह्यांत, "एडन अगर पेरीम ह्या वसाहतींत असला, तर तो अर्ज पोंचल्याच्या तारखेपासून एका महिन्यांच्या आंत" ह्या मजकुराच्या बदला "एडनांत असला, तर तो अर्ज पोंचल्याच्या तारखेपासून एका महिन्याच्या आंत" हा मजकूर दाखल करावा. सन १८९१ चें रेग्युलेशन २ रें ह्यांत "एडन" ह्या शब्दाची व्याख्या दिलेली आहे तीप्रमाणें त्या शब्दाचा अर्थ, एडनची वसाहत आणि शेख ओथमान, इमाद व हिस्वा हीं गांवें आणि पेरिमचें बेट व लिटल एडन हीं धरून त्या वसाहतीच्या वहिवाटीखालील ज्या मुलखावर मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल ह्यांचा अमल चालतो, तो मुलख, असा आहे.

१०. प्रस्तुत सुचविलेल्या आणि आमच्या पहिल्या रिपोर्टांत सुचविलेल्या सुधारणां सदर्हू मसुद्यांत दाखल करून त्याची एक प्रत आम्हीं सोबत जोडली आहे; आणि आमची अशी सूचना आहे कीं, ह्या रिपोर्टाचे आणि प्रस्तुत सुधारला आहे तशा सदर्हू मसुद्याचे मराठी व गुजराती तरजुमे तयार करून मुंबई सरकारी गझेटांत प्रसिद्ध करावे; आणि सिंधी तरजुमा सिंध आफिशियल गझेटांत प्रसिद्ध करावा.

११. शेवटीं आमची अशी सूचना आहे कीं, हा मसुदा पसार होऊन त्याचा कायदा झाला तर एक्झिक्यूटिव सरकारानें बॉयलर तपासण्याविषयींचा आक्ट त्याप्रमाणें सुधारून, लोकांच्या उपयोगासाठीं पुनः प्रसिद्ध करावा.

(सही) एच्. वर्डवुड.
( „ ) बेसिल ल्यांग.
( „ ) एच्. ब्याटी.
( „ ) टी. डॉ. लिट्ल.
( „ ) नवरोजी एन्. वाडिया.
( „ ) ए. विंगेट.

मुकाम पुणें, तारीख ९ आक्टोबर सन १८९६.

---

## सन १८९६ चा मसुदा नंबर १.

### ( सन १८९१ चा मुंबईचा बॉयलर तपासण्याविषयींचा आक्ट सुधारण्याबाबद्च्या आक्टाचा मसुदा. )

( तारीख २१ माहे सप्तेंबर सन १८९६ रोजीं सिलेक्ट कमिटीनें सुधारल्याप्रमाणें. )

ज्या अर्थी सन १८९१ चा मुंबईचा बॉयलर तपासण्याविषयींचा आक्ट खालीं लिहिलेल्या रीतीनें सुधारणें योग्य आहे, त्या अर्थीं खालीलप्रमाणें ठरविण्यांत येत आहे :—

कलम २ ह्यांत जास्त मजकूर दाखल करणें.

१. सन १८९१ चा मुंबईचा बॉयलर तपासण्याविषयींचा आक्ट, ज्यास ह्यापुढें सदर्हू आक्ट ह्मटलें आहे, त्याच्या २ ऱ्या कलमांत खालील पोटकलम ज्यास्त दाखल करावें, आणि तें त्यांत नेहेमी होतें असें समजावें : तें पोटकलम येणेंप्रमाणें :—

"( ३ ) आणि सन १८८७ चा मुंबईचा बॉयलर तपासण्याविषयींचा आक्ट ह्या-अन्वयें केलेल्या ज्या ज्या कानू व नेमणुका, प्रसिद्ध करण्यांत आलेले जे जे जाहिरनामे आणि देण्यांत आलेले जे जे अधिकार, हा आक्ट अमलांत यावयाच्या तारखेस अमलांत असतील त्या त्या कानू व नेमणुका आणि ते ते जाहिरनामे व अधिकार, ह्या आक्टाला विरुद्ध नसतील तेथवर, अनुक्रमें ह्या आक्टाअन्वयें केलेल्या आहेत, आणि प्रसिद्ध केलेले व दिलेले आहेत असें समजावें.

कलम ६ ह्याची सुधारणा.

२. (१) सदर्हू आक्टाचें कलम ६, पोटकलम (१), ह्यांत "कोणत्याही" ह्या शब्दाच्या आधीं, "पोटकलम (२) ह्यांतील विशेष ठराव लागू राहून" हा मजकुर दाखल करावा.

(२) त्याच कलमाचें पोटकलम ( २ ) ह्याच्या बदला खालील पोटकलम दाखल करावें: तें येणेंप्रमाणें:—

"(२) मात्र इतकेंच कीं,

नवीन बॉयलराच्या संबंधानें विशेष ठराव.

(इ) ज्या कोणत्याही बॉयलराबद्दल पूर्वीं कोणताही दाखला दिलेला नसेल त्या बॉयलराच्या बाबतींत इन्स्पेक्टर दाखला तावडतोब देण्यास समर्थ नसेल तर त्यानें, तो बॉयलर तपासल्यानंतर ४८ तासांच्या आंत, त्या बॉयलराच्या मालकास एक हंगामी हुकुम लिहून दिला

पाहिजे; आणि त्या हुकुमांत, दाखला देण्यांत किंवा देण्याचें नाकारण्यांत येई तोंपर्यंत तो बॉयलर त्याच्या मतें किती दाबानें चालू ठेवण्यास हरकत नाहीं तें निर्दिष्ट केलेलें असलें पाहिजे; आणि पोटकलम (१), रकम (ड) यांतील ठराव लागू राहून, त्या मालकानें दाखला देण्यांत किंवा देण्याचें नाकारण्यांत येई तोंपर्यंत अशा हंगामी हुकुमाअन्वयें तो बॉयलर चालू ठेवणें कायदेशीर होईल;

दाखला दिलेल्या बॉयलरां संबंधानें विशेष ठराव.

(फ) पोटकलम (१) याच्या (ड) रकमेंतील ठराव लागू राहून, जो कोणत्याही बॉयलरचा मालक सदरीं सांगितल्या प्रकारचा त्या बॉयलरबद्दलचा दाखला धारण करीत असेल, आणि जो अशा दाखल्याची मुदत संपण्यापूर्वीं, सदहू मुदत संपल्यानंतर त्या बॉयलरचा उपयोग करीत राहण्याचा आपला इरादा आहे ह्मणून नोटीस देईल, त्यास, तो बॉयलर तपासल्यानंतर इन्स्पेक्टरानें लेखी हुकुम करून त्या बॉयलरचा उपयोग करण्याचें अगदीं बंद ठेवण्याबद्दल फर्माविलें नाहीं तर, नवीन दाखला देण्यांत येई किंवा नाकारण्यांत येई तोंपर्यंत त्या बॉयलरचा उपयोग करीत राहण्याचा अगर उपयोग करण्याची परवानगी देण्याचा अखत्यार आहे. परंतु त्यानें—

(१) मुदत संपलेल्या दाखल्यांत जो दाब असण्याविषयीं परवानगी दिलेली असेल, किंवा

(२) इन्स्पेक्टरानें बॉयलर तपासून जो कोणताही हंगामी हुकुम लिहून दिलेला असेल, त्यांत जो दाब असण्याविषयीं परवानगी दिलेली असेल,

त्या दाबापेक्षां कोणत्याही अधिक दाबानें सदरहू प्रकारें त्या बॉयलरचा उपयोग करूं नये किंवा उपयोग करूं देऊं नये;

एकाच मालकाच्या बॉयलराच्या दोन गटांच्या संबंधानें विशेष ठराव.

(ग) जे बॉयलर एकाच मालकाचे असून असे बसविलें असतील कीं त्यांपैकीं कोणत्याही एका बॉयलराचें अंतर त्यांपैकीं दुसऱ्या कोणत्याही बॉयलरापासून एक हजार फुटांपेक्षां जास्त नाहीं, त्या बॉयलरांच्या दोनपेक्षां जास्त नाहींत अशा गटांची व्यवस्था पाहण्यासाठीं व ते स्वाधीन ठेवण्यासाठीं जो कोणताही मनुष्य नेमिला जाईल तो मनुष्य, त्या बॉयलरांच्या दरम्यान सदरीं सांगितल्याप्रमाणें अंतर असलें तरी, त्या सर्व बॉयलरांची प्रत्यक्ष रीतीनें व स्वतः व्यवस्था करण्यासाठीं आणि ते सर्व बॉयलर आपल्या स्वाधीन ठेवण्यासाठीं त्यास नेमिलेलें आहे असें समजलें पाहिजे.

(३) आणि खालील मजकूर पोटकलम (३) ह्मणून दाखल करावा: तो येणेंप्रमाणें:—

हंगामी हुकमाची मुदत संपणें आणि तो स्वाधीन करणें.

"(३) कोणत्याही बॉयलराबद्दल कोणताही दाखला [पहिल्यानें] देण्यांत आल्यानंतर, पुनः देण्यांत आल्यानंतर, किंवा नाकारण्यांत आल्यानंतर अगर कोणत्याही बॉयलराबद्दल ह्या कलमाअन्वयें देण्यांत आलेला हंगामी हुकुम परत करण्यांत यावा ह्मणून कलेक्टराकडून किंवा ह्या बाबतींत सामान्यतः किंवा विशेषतः लेखीरीतीनें अधिकार दिलेल्या कोणत्याही मनुष्याकडून लेखी हुकुम पोंहचल्यानंतर, सदरहू प्रकारें त्या बॉयलराबद्दल देण्यांत आलेला हंगामी हुकुम अमलांत राहणार नाहीं."

कलम ११ याची सुधारणा.

३. सदहू आक्टाच्या ११ व्या कलमांत, "पुन्हा मुदतीचा" ह्या शब्दांनंतर "किंवा दाबाचा" हे शब्द दाखल करावे.

कलम १२ ह्याची सुधारणा.

८. (१) सदहू आक्टाच्या १२ व्या कलमांतील (१) पोटकलमांत, "तो बॉयलर मुंबई शहरांत असला तर तो अर्ज पोहोंचल्याच्या तारिखेनंतर चार दिवसांच्या आंत, व तो बॉयलर इतर ठिकाणीं असला तर तो अर्ज पोंचल्याच्या तारिखेनंतर दहा दिवसांच्या आंत" ह्या मजकुराच्या बदला खालील मजकूर दाखल करावा. तो येणेंप्रमाणेंः—

"तो बॉयलर जर—

(अ) मुंबई शहरांत असला, तर तो अर्ज पोंचल्याच्या तारखेपासून चार दिवसांच्या आंत,

(ब) एडनमध्यें असला, तर तो अर्ज पोंचल्याच्या तारखेपासून एका महिन्याच्या आंत, आणि

(क) इतर ठिकाणीं असला, तर तो अर्ज पोंचल्याच्या तारिखेपासून दाहा दिवसांच्या आंत."

(२) सदहू कलमाचें पोटकलम (२) ह्यांत, "त्या मुदतीचा" ह्या शब्दांनंतर "आणि जो दाव असण्याविषयीं परवानगी देणें योग्य वाटेल त्या दाबाचा" हे शब्द दाखल करावे.

कलम १६ ह्याची सुधारणा.

९. सदहू आक्टाचें कलम १६ ह्यांत,—

(अ) "कलम १०, १२ अगर १४ याअन्वयें ज्या मुदतीबद्दल दाखला दिलेला असेल" ह्या मजकुराच्या ऐवजीं "कलम ६ ह्याच्या (२) पोटकलमाअन्वयें हंगामी हुकुम किंवा कलम १०, १२ अगर १४ ह्यांअन्वयें दाखला ज्या मुदतीबद्दल दिलेला असेल" हा मजकुर दाखल करावा;

आणि (ब) त्याच कलमांत "तो" आणि "दाखला" ह्या शब्दांच्या दरम्यान "हंगामी हुकुम अगर" हे शब्द दाखल करावे.

कलम १८ ह्याची सुधारणा.

६. (१) सदहू आक्टाचें कलम १८, पोटकलम (१), ह्यांत;—

(अ) "दाखला" हा शब्द तीन ठिकाणीं आला आहे त्या तीनही ठिकाणीं, त्या शब्दाच्या पूर्वी "हंगामी हुकुम अगर" हे शब्द दाखल करावे;

(ब) "सर्व वाजवी वेळीं" ह्या शब्दांनंतर, "मुंबईच्या कलेक्टरानें अगर" हे शब्द दाखल करावे;

(क) "अशा माजिस्ट्रेटानें किंवा कलेक्टरानें" ह्या शब्दाच्या बदला "सदहू शहरांत अशा कलेक्टरानें किंवा माजिस्ट्रेटानें अगर इतर ठिकाणीं अशा कलेक्टरानें" हा मजकुर दाखल करावा.

(२) सदहू कलमाचें पोटकलम (२) ह्याच्या बदला खालील पोटकलम दाखल करावें; तें येणेंप्रमाणेंः—

"(२) कोणत्याही बॉयलरबद्दल दिलेला हंगामी हुकुम किंवा दाखला अमलांत असेल त्या मुदतींत जो कोणताही मनुष्य त्या बॉयलरचा मालक होईल, त्यास त्या पहिल्या मालकाकडून तो हंगामी हुकुम व तो दाखला मिळण्याचा हक्क प्राप्त होऊन तो पोटकलम (१) ह्यांतील ठरावांस पात्र होईल."

कलम २४ ह्यांत जास्त मजकूर दाखल करणें.

७. सदहू आक्टाच्या २४ व्या कलमाच्या (३) व्या पोटकलमांत खालील मजकुर जास्त दाखल करावाः—

"असा जाहिरनामा प्रसिद्ध झाला ह्मणजे अशा एंजिनियरचा दाखला रद्द करण्याचा गव्हर्नर इन् कौन्सिल यांस अधिकार आहे;

"मात्र असें ठरविलें आहे कीं, अशा एन्जिनियरानें जर आपण सदर्हूप्रमाणें मिघून गेल्याबद्दल अगर आपला दाखला हजर करण्यास चुकल्याबद्दल गव्हर्नर इन् कौन्सिल यांची खात्री होईल असा खुलासा केला, तर, त्यांस, कोणत्याही वेळीं, तो दाखला रद्द करण्याबद्दलचा सदर्हू प्रकारचा हुकुम परत घेण्याचा आणि सदर्हूप्रमाणें रद्द केलेला दाखला त्या एन्जिनियरास परीक्षा घेतल्याशिवाय पुनः देण्याचा अधिकार आहे;

"आणि अशा रीतीनें पुनः दिलेल्या दाखल्याचा अमल, तो दाखला परीक्षा घेऊन दिलेला असल्याप्रमाणेंच चालेल."

८. सदर्हू आक्टाचें कलम २८, रकम (ब), हींत, "दाखला" ह्या शब्दाच्या आधीं "हंगामी हुकुम अगर" हे शब्द दाखल करावे. कलम २८ ह्याची सुधारणा.

९. (१) सदर्हू आक्टाचें कलम २९, पोटकलम (१), रकम (अ), हींत, "दाखल्यावांचून" ह्या शब्दाच्या आधीं "हंगामी हुकुमावांचून अगर" हे शब्द दाखल करावे. कलम २९ ह्याची सुधारणा.

(२) सदर्हू कलमाचें पोटकलम (१), रकम (क), हींत, "दाखल्यावरून" ह्या शब्दाच्या आधीं "हंगामी हुकुमावरून किंवा" हे शब्द दाखल करावे.

१०. सदर्हू, आक्टाचें कलम ३९, रकम (ड), हींत खालील मजकुर जास्त दाखल करावा:— कलम ३५, रकम (ड), हींत जास्त मजकूर दाखल करणें.

"आणि कलम २६ अन्वयें दिलेल्या डुप्लिकेट दाखल्यांबद्दल द्यावयाची फी ठरविण्याबद्दल."

(True translation.)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.